सकाळ

# रवळनाथ सोसायटीकडून सामान्यांना लाभ



चौगुले



ताम्हणकर

सांगली, ता. २२ : मुगळी (ता. गडहिंग्लज) येथील एम. एल. चौगुले यांनी मध्यमवर्गीयांना आपल्या हक्काचं घरकुल साकारण्यासाठी सुलभ अर्थसहाय्य करण्याच्या उद्देशाने 'श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी'ची स्थापना केली. दोन दशकांच्या यशस्वी वाटचालीत ३७१ कोटींच्या ठेवीसह यशाचे शिखर गाठलेल्या संस्थेने विविध सामाजिक उपक्रमातून वंचित, पीडितांना मदतीचा हात दिला आहे. २४ डिसेंबरला सांगली येथे दहाव्या शाखेचा प्रारंभ होत आहे.

शिक्षक, शासकीय आणि निमशासकीय नोकरदारांना स्वप्नातील घरकुल बांधण्यासाठी सुलभ अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीची स्थापना झाली. संस्थेच्या अर्थसहाय्यातून आजअखेर तब्बल तीन हजारांवर घरकुले उभी राहिली आहेत. १४ ऑक्टोबर १९९६ रोजी एम. एल. चौगुले यांनी डॉ. शिवशंकर उपासे, प्रा. आर. एस. निळपणकर व सहकाऱ्यांच्या मदतीने केवळ १८ सभासद व १० हजार भाग भांडवलावर संस्थेची स्थापना केली.

शाखेत आरटीजीएस, एनईएफटी, मायक्रो एटीएम, डेबीट कार्ड, मोबाईल बँकिंग, क्युआर कोड, लॉकर व वीज बिले भरण्याची सुविधा आहे. संस्थापक अध्यक्ष श्री. एम. एल. चौगुले यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, संचालक आर. एस. निळपणकर, महेश मजती, दत्ता पाटील, किरण पोतदार, सुशांत करोशे, विजयकुमार घुगरे, रेखा पोतदार, मीना रिंगणे, प्राचार्य एस. एन. देसाई, डी. के. मायदेव यांच्यासह सर्व शाखा चेअरमन व सल्लागार आणि व्यवस्थापक शिवानंद घुगरे, सागर माने, बाबासो मार्तंड यांच्या एकजुटीने संस्थेची यशस्वी वाटचाल सुरू आहे.